IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्था आणि आत्मनिर्भर भारत संकल्पना

**प्रा. जाधव विकास कृष्णा**
सहा. प्राध्यापक इतिहास विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, महाड, जि. रायगड
vikasjadhavkagal@gmail.com

**प्रस्तावना:-**

आर्थिक इतिहास म्हणजे भूतकालातील अर्थव्यवस्थांचा स्थूल मानाने केलेला अभ्यास होय. अर्थव्यवस्थेची उत्क्रांती, स्थिती, लय यांचे एकूण ऐतिहासिकरित्या विश्लेषण करणे हे आर्थिक इतिहासाचे महत्त्वाचे कार्य आहे. आर्थिक इतिहासाचे क्षेत्र हे अर्थशास्त्राच्या क्षेत्राहून वेगळे आहे. थोडक्यात अर्थशास्त्र हे समाजाच्या चालू आर्थिक प्रश्नांचा ऊहापोह करते तर आर्थिक इतिहास गतकाळातील आर्थिक घटनांचे स्पष्टीकरण करतो.

मध्ययुगीन भारताच्या आर्थिक इतिहासाचा आढावा घेत असताना प्रामुख्याने आपल्याला सुलतानशाही व मुघलशाहीच्या कालखंडात घडलेल्या आर्थिक घटनांचा अभ्यास करावा लागेल. इ.स. ७१२ मध्ये मुहम्मद बिन कासिम च्या सिंध विजयानंतर पुढे काही काळ मुस्लिम आक्रमकांची आक्रमणे भारतात सतत झाली. त्यामध्ये महम्मद गझनीने भारतावर १७ स्वाऱ्या केल्या व भारतातून प्रचंड संपत्ती मायदेशी नेली. त्यानंतर सत्तेवर आलेल्या महम्मद घोरीने सन ११७५ मध्ये मुलतान जिंकून घेत गझनी पासून बंगाल पर्यंत सत्तेचा विस्तार केला. अशारीतीने प्रचंड संपत्ती भारतातून बाहेर गेली. तरीही भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा फारसा विपरीत परिणाम झाला नाही. सन १२०६ मध्ये महम्मद घोरीच्या मृत्यूनंतर कुतुबुद्दीन एबकच्या रूपाने दिल्लीवरती सुलतानशाहीची सत्ता सुरू झाली.

सुलतानशाहीच्या काळात भारतीय समाजाने अनेक आर्थिक चढ उतार पाहिले. परंतु महम्मद बिन तुघलक, फिरोज शहा तुघलक या सारख्या सुलतानांच्या कृषीविषयक सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था तग धरून राहिली. पुढे १५२६ नंतर सत्तेवर आलेल्या मुघलशाहीने भारतीय अर्थव्यवस्था स्थिर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यामध्ये शेरशहा, अकबर, मलिक अंबर यांसारख्या राज्यकर्त्यांनी अवलंबलेल्या जमीन महसूल व कृषी विषयक धोरणांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था स्थिर व मजबूत बनली. पुढे ब्रिटिश येईपर्यंत भारतीय अर्थव्यवस्था परंपराग पद्धतीने चालू होती. परंतु ब्रिटिशांच्या हस्तक्षेपामुळे नंतरच्या काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत प्रचंड बदल झाले. या अनुषंगाने आपण मध्यमयुगीन काळातील आर्थिक बाबींवर परिणाम करणाऱ्या घटनांचा आढावा घेऊ.

**उद्देश:-**

१) मध्ययुगीन कालखंडातील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे.
२) आर्थिक घटनांच्या स्पष्टीकरणासाठी उपलब्ध आकडेवारीचा व शास्त्रीय संशोधन पद्धतीचा उपयोग करणे.
३) अर्थशास्त्रातील सिद्धांताचा पडताळा पाहणे.
४) आर्थिक वस्तूस्थिती व घटना या मधील कार्यकरणसंबंध प्रस्थापित करणे.
५) कालखंडानुसार अर्थव्यवस्थेत झालेल्या आर्थिक बदलांचा अभ्यास करणे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**संशोधन पद्धती :-**

सदर संशोधन लेख लिहिण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर केला आहे. यामध्ये वेगवेगळी संदर्भ पुस्तके व क्रमिक पुस्तके यांचा वापर केला आहे.

विश्लेषण :-

आर्थिक इतिहास समजावून घेताना सुलतानशाही व मुघलशाहीतील घडलेल्या आर्थिक घटनांचा तुलनात्मक इतिहास समजावून घ्यावा लागेल.

**अ) सुलतान व मुघलशाहीच्या काळातील विविध कर :-**

सुलतानशाहीच्या काळातील आर्थिक स्थितीचा आढावा घेत असताना सुलतानशाहीच्या उत्पन्नाची साधने कोणती होती? भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य घटक असणारा कृषी व्यवसायाचा आढावा घेणे आवश्यक ठरेल.

१) सुलतान व मुघलशाहीच्या उत्पन्नाची साधने :-

कुतुबुद्दीन पासून सत्तेवर आलेल्या वेगवेगळया सुलतानांनी व मुघल बादशाहानी जनतेवर प्रचंड कर लादले ते म्हणजे

1 उशर :- मुस्लिम शेतकऱ्यांकडून त्यांचे उत्पन्नाच्या १/१० घेण्यात येणारा कर

2 खराज :- मुस्लिम तर म्हणजेच हिंदू शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पन्नाच्या १/१० घेण्यात येणाऱ्या कर

3 जकात- मुस्लिम प्रजेकडून तिच्या उत्पन्नाच्या अडीच टक्के धार्मिक कर घेण्यात येत असे या कराची उत्पन्न मशिदी थडगे यांची दुरुस्ती, धार्मिक बाबींवरील खर्च गरीब मुस्लिम लोकांना आर्थिक मदत देण्यासाठी खर्च केला जात असे.

4 जिझिया- मुसलमानी राज्यात हिंदू प्रजेला राहू दिल्याबद्दल हा धार्मिक कर सक्तीने वसूल केला जाई. फिरोजशहाच्या कारकिर्दीत ब्राह्मणांवर देखील हा कर लागू केला होता.

5 खामस- हिंदू विरुद्धच्या लढाईमध्ये मिळालेले लुटीतील १/५ हिस्सा सरकार जमा होत असे. अर्थात ४/५ हिस्सा सैनिकांना मिळत असे.

6 इतर कर- सुलतानशाहीच्या काळात व्यापारी आयात मालावर अडीच टक्के ते दहा टक्के कर द्यावा लागत असे. खाणींच्या उत्पन्नावर १/५ कर शासन वसूल करत असे. याशिवाय वारस नसलेल्या मृत व्यक्तींची मालमत्ता सरकार जमा होत. खंडणी, मिळणारे नजराने ही राज्याच्या उत्पन्नाची मोठी साधने होती.

विविध करांच्या बोज्याखाली सुलतानशाही व मुघलशाही अर्थव्यवस्था ढवळून निघाली होती. असे असले तरी शेती व्यवसाय प्रमुख व्यवसाय असल्यामुळे शेती व्यवसायातील विविध घटनांवर अर्थव्यवस्था स्थिर, अस्थिर होत राहिली.त्याची माहिती पुढील प्रमाणे:-

**ब) कृषी व्यवस्था व जमीन महसूल व्यवस्था :-**

मध्ययुगीन काळात भारतीयांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. त्यामुळे वेगवेगळया सुलतान व बादशाहांच्या काळामध्ये कृषी व्यवस्थेमध्ये बदल होत गेले. शेतीमध्ये अनेक सुधारणा झाल्या. त्यामुळे विविध कृषी कर लागू करण्यात आले. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली. आर्थिक विकास होण्यास मदत झाली. कृषी व्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा पाया असल्यामुळे त्यांची माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल त्यासाठी काही प्रमुख सुलतानांच्या काळातील कृषी विकासाचा व मुघलशाहीतील काही बादशहांच्या काळातील कृषी व्यवसाय व जमीन महसुली त्यांचा अभ्यास पुढील प्रमाणे:-

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

I) अल्लाउद्दीन खिलजी :-

अल्लाउद्दीनने सर्वप्रथम जमिनीचे मोजणी करून जमिनीच्या उत्पादन क्षमतेनुसार जमीन महसूल वसूल केला. हिंदू जनतेकडून शेतसारा उत्पन्नाच्या ५०% घेण्यात येऊ लागला जमीन महसूल बरोबरच घरपट्टी, कुरणपट्टी, पशूकर असेकर घेतले जात होते. हिंदूं कडून सक्तीने जिझिया कर वसूल केला जाई. सुलतानाने महसूल विभागातील हिंदू अधिकारी चौधरी, खोत, मुकादम, यांना देण्यात येणार्या परंपरागत सवलती बंद करून त्याने सर्व सामान्य हिंदूंप्रमाणे कराच्या चक्रात खेचले. कमी वेतनात सैनिकांचा खर्च भागावा म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे भाव नियंत्रित करण्याचे 'बाजारभाव नियंत्रणाचे धोरण' राबविले. अल्लाउद्दीनच्या आर्थिक धोरणामुळे हिंदू प्रजा अक्षरशा कंगाल बनली.

II) महम्मद बिन तुघलग :-

महंमदाने सुपीक प्रदेश दुआबातील शेत सारा ५% ते १०% टक्क्यांनी वाढवल्यामुळे जनतेने उठाव केला. त्याचवेळी भयंकर दुष्काळ पडल्यामुळे जनतेस धान्य, कापड, द्रव्य आदि वस्तूंचा पुरवठा केला. दुष्काळग्रस्ताना काम मिळवून देण्यासाठी विहिरी, तलाव, कालवे इ. बांधकामे शासनामार्फत सुरू करण्यात आली. शेतीची प्रगती करण्यासाठी 'दिवाण-ए-कोही' हा कृषी विभाग स्थापन केला या विभागाच्या माध्यमातून तीन लक्ष बिघे ओसाड जमीन लागवडीखाली आणली तीन वर्षात ७० लक्ष टंका खर्च केला. परंतु सुलतानाचा हा प्रयोग फसला. शासन व शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले.

III) फिरोजशहा तुघलक :-

फिरोजशहाने शेतकऱ्यांकडे थकबाकी असलेले सर्व सरकारी कर्ज त्यांना माफ केले. याशिवाय शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी अनेक नद्यांना धरणे बांधली. शेतीसाठी ३० मोठे जलाशय निर्माण केले. जमिनीच्या उत्पन्नाच्या १/२० इतकी पाणीपट्टी वसूल केली. दिल्ली जवळ लावलेल्या बाग बगीचा पासून दरवर्षी त्याला एक लक्ष ऐंशीहजार टंका उत्पन्न मिळत होते. फिरोजशहाने पाच कालवे काढले प्रचंड जमीन पाण्याखाली आणून प्रचंड उत्पादन घेतले अशा प्रकारे शेतीचे उत्पादन वाढविण्यात फिरोजशहा यशस्वी झाला.

सुलतानाप्रमाणेच मुघल बादशाहानी देखील शेती व जमीन महसूल सुधारणेकडे अधिक लक्ष देऊन कृषी व्यवसाय विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्याची माहिती पुढील प्रमाणे :-

IV) अकबर व मलिक अबर कालीन शेती व जमीन महसूल सुधारणा-

मध्ययुगीन भारतातील मुघलकालीन शेती व्यवसायांचा अभ्यास करताना अकबर व मलिक अंबर यांच्या शेतीविषयक धोरणांचा व महसूल पद्धतीचा अभ्यास करावा लागेल. शेरशहाच्या अकाली मृत्यूने आणि त्याच्या जमीन महसूल प्रणालीतील राहिलेले अपूर्ण कार्य अकबर आणि मलिक अंबरने पूर्ण केले.

i) अकबर कालीन जमीन महसूल पद्धत :-

अकबराने जमीन महसूल सुधारण्याचा पहिला प्रयोग सन १५६० मध्ये केला. त्यानुसार त्याने जमीन महसूलाचे एकूण सहा प्रयोग केले. सहाव्या प्रयोगात झब्त ही महसूल पद्धत शास्त्रशुद्ध पद्धतीने ठरविण्यात आली. त्यासाठी १५७१ ते १५८० पर्यंतच्या प्रत्येक जमिनीच्या दहा वर्षाचे सरासरी उत्पन्न तसेच दहा वर्षातील धान्याच्या किंवा पिकांच्या किमतीचे सरासरी दर काढण्यात आले. अकबराची ही जमीन महसूल पद्धत 'राजा तोडरमलाचा बंदोबस्त' या नावाने देखील ओळखली

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

जाते. अकबरकालीन जमिनीची वर्गवारी 'पोलाज' 'परोती' 'चाचर' 'बंजर' या चार प्रकारात करण्यात आली. एकंदरीत तोडरमलच्या या सुधारणांची माहिती ऐंने अकबरी या ग्रंथात देण्यात आली आहे. जमिनीच्या प्रतवारीनुसार जमीन महसूल आकारल्यामुळे शेतकऱ्याचा फायदा झाला. त्यांना योग्य कर शासनाला देणे शक्य झाले. शेतसारा वसुलीसाठी खेडेगावात पाटील, कुलकर्णी, परगण्यात, अमीन व जिल्ह्यातबितकीची, प्रांतात दिवाण तर केंद्रात वजीर शेतसारा वसुलीचे काम पाहत होते.

अकबराने घालून दिलेली महसूल पद्धत पुढे औरंगजेबच्या काळापर्यंत कायम होती. त्यामुळे शेतीतील उत्पादन बऱ्यापैकी कायम राहिले. राज्याचे उत्पन्न वाढत राहिले. त्यामुळे आर्थिक स्थिरता आली. महसूल उत्पन्नात वाढ होत गेली. उदा. अकबरच्या काळात १३ कोटी २१ लक्ष ३६ हजार ८३१ रुपये महसूल उत्पन्न होते. तेच शहाजहानच्या काळात ३६ कोटी होते असे अबुल फजल लिहितो. थोडक्यात मुघलकाळातही शेती व्यवसायातूनच अर्थव्यवस्था विकसित झाल्याचे आढळते.

ii) मलिक अंबरकालीन जमीन महसूल पद्धत :-

मलिक अंबरने सन १६०० पासून १६२६ पर्यंत निजामशाहीचा कारभार पाहिला. यावेळी त्यांनी अनेक सुधारणा केल्या. महसूल व्यवस्थेत बदल केले. निजामशाही मुलखाची जमीन मोजून महसुलाचे दर ठरविले. शेतीची मागणी व पाहणी करून मागील अनेक वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून प्रत्येक क्षेत्रावर सरकारचे नक्त देणे ठरविले. आणि ते पिकांच्या मानाने कमी जास्त देण्याची व्यवस्था केली. नवीन जमीन लागवडीखाली आणून प्रत्यक्ष जमीन ठेक्याने देण्याची जुनी इजारा पद्धत बंद केली. ही पद्धत शेतकऱ्यांना हानिकारक होती. तिच्या जागी तोडरमलची झब्त पद्धत लागू केली. त्याच्या या महसूल पद्धतीमुळे (रयतवारी) मलिक अंबर चे नाव इतिहासात अमर झाले.

iii) अकबर व मलिक अंबर कालीन जमीन महसूल पद्धतीचे मूल्यमापन व त्यांचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम:

अकबर व मलिक अंबर हे थोर प्रशासक होते. शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली. त्याच बरोबर साम्राज्याचे उत्पन्न वाढले जावे याकडेही लक्ष पुरविले. त्यामुळेच त्यांनी राबवलेल्या महसुल व्यवस्थेचे अनेक इतिहासकारांनी मूल्यमापन केले आहे.

१) मध्यस्थ दूर केल्याने त्यांच्याकडून शेतकऱ्यांवर होणारा जुलूम थांबला. आणि शेतकरी व शासन यांचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले.
२) नै. आपत्ती, युद्धजन्य परिस्थिती, राजपुत्रांचे शिकारीचे छंद इ. कारणांनी शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास भरपाईची तरतूद करण्यात आली.
३) कर्जाची सोय केली. परतफेड सुलभ केली. त्यामुळे शेती उत्पादन वाढले शासनाचेही उत्पन्न वाढले. परिणामी आर्थिक विकास झाला. अकबरच्या महसूल सुधारणे बाबत डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यास जमिनीचा मालक म्हणून मान्यता मिळाली. ते आपले उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करू लागले. त्यामुळे देशांची प्रगती होण्यास मदत झाली.

वरील प्रमाणे मध्ययुगीन कृषी व्यवसायामुळे भारतीय अर्थव्यवस्था विकसित झाली. काही राज्यकर्त्यांच्या धोरणांचा बरा वाईट परिणाम हा कृषी विभागा बरोबरच अर्थव्यवस्थेवर ही झाला. मध्ययुगीन कालामध्ये निर्माण झालेल्या छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांचा परिणाम ही आर्थिक विकासावर झालेला आपणास दिसतो. काही प्रमुख उद्योगामुळे अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम झाला.

**सुलतान व मुघलशाहीच्या काळातील प्रमुख उद्योग :-**

**i) कापड उद्योग :-**

सुलतानशाहीच्या काळातही कापड उद्योग हा महत्त्वाचा उद्योग होता. दिल्ली, आग्रा, बनारस सोनारगाव, पाटना, लाहोर ,मुलतान, सुरत, देवगिरी यासारख्या शहरांमध्ये कापड उद्योग केंद्रित झालेला होता. बंगाल तलम मलमलीसाठी प्रसिद्ध होते.खंबायत सुती कापडासाठी प्रसिद्ध होते. काश्मीर निरनिराळ्या शाली, ब्लँकेट्स आणि इतर लोकरी कपड्यांसाठी प्रसिद्ध होते. इरफान हबीब यांच्या मते, 'भारतातील शेती व्यवसायानंतर कापड उद्योग महत्त्वाचा व मोठा होता. ऐने अकबरी विदेशी प्रवासांचे प्रवास वृत्तांत ईस्ट इंडिया कंपनीच्या नोंदीवरून लक्षात येते की भारतात सुमारे १६० प्रकारचे कापड तयार होत असून मुघल कालीन भारतात ५० प्रकारचे कापड तयार होत होते'.

मोरलँड यांच्या "अकबरकालीन हिंदुस्तान" या ग्रंथावरून आफ्रिकेचा पूर्व किनारा अरबस्तान, इजिप्त, ब्रह्मदेश, फिलिपाईन्स, मेक्सिको अशा अनेक देशात सुती कापड निर्यात केले जात होते. थोडक्यात भारताची या व्यवसायात मक्तेदारी होती. कापड उद्योग हा भारताच्या अर्थव्यवस्थेत उलाढाल करणारा महत्त्वाचा उद्योग होता. कापड उद्योगामुळेच मध्येयुगीन भारताला महत्त्व प्राप्त झाले होते. लोकांची आर्थिक प्रगती सुधारण्यास मदत झाली होती.

**ii) धातू उद्योग :-**

धातू व्यवसाय हा प्राचीन भारतीय व्यवसाय असून याही व्यवसायाला मोठी परंपरा होती. दिल्ली जवळील मेहरोली स्तंभ, प्राचीन काळातील घर बांधताना उपयोगात आणलेले लोखंडाचे खांब यावरून भारतियाची धातू व्यवसायात अप्रतिम प्रगती होती. लाहोर, अजमेर, कालींजर, ग्वाल्हेर अशा अनेक प्रांतात लोखंडाच्या खाणी होत्या. लोखंडापासून शेतीची अवजारे बनविण्याचे काम लोहार करत खेडेगावात हे कारागीर होते. पंजाबात कुलपे बनवत असत. मेवाड व बिकानेर येथे लष्करी साहित्य व शस्त्रे बनवली जात असत. महाराष्ट्रात लोखंडी तोफा बनविल्या जात. लोखंडाची भांडी बनवत असत.

तांबे या धातूचा खूप मोठा उपयोग केला जाईल. तांब्यापासून नाणी तयार करणे, इमारतीचे घुमट, बंदुका, तोफा, भांडी, देवळाचे कळस, मूर्ती अशा अनेक वस्तू बनविल्या जात सोन्याचा उपयोग नाणे, दागिने राजसिंहासन बनविणे तसेच राजाची सुवर्णतुला करणे इत्यादींसाठी केला जात असे.मैसूर व कोलार येथे मध्ययुगात सोन्याच्या खाणी होत्या. अब्दुल रज्जाक लिहितो विजय नगरच्या राजाचे सिंहासन खूप मोठे रत्नजडित सोन्याचे होते. दरबारातील सरदार सोन्याचे अलंकार किती व कसे वापरतात याचेही वर्णन परकीय प्रवास वृत्तांततात आले आहे. दक्षिण भारतात हिरे व रत्नांच्या खाणी होत्या. बारबासो हा प्रवासी लिहितो की आंध्र प्रदेशात ही हिऱ्यांचे उत्पादन व व्यापार होता. चंदेरी बुदेलखंड या भागात हिर्यांच्या खाणी होत्या. ट्रॅव्हेनियर हा प्रवासी स्वतः हिऱ्यांचा व्यापारी होता. त्याने दक्षिणेतील हिऱ्यांच्या खाणींची माहिती लिहिली आहे. यातून या काळातील आर्थिक उलाढालीची माहिती मिळते.

**iii) साखर उद्योग :-**

मध्ययुगीन काळात साखर उद्योग हा भरभराटीस आला होता. मुघल काळात या उद्योगात मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. सन १८३८ मध्ये लाहोर येथे सात रुपये मण तर सन १८८१ मध्ये वाराणसी येथे अकरा रुपये मण साखरेचा दर होता. लाहोर ते अलाहाबाद या प्रदेशात उसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाई. आग्रा, बनारस, गाजीपुर महाराष्ट्रात साष्टी भागात साखर उत्पादन प्रचंड घेतले जाईल. त्यामुळे देखील अर्थव्यवस्थेला गती मिळालेली दिसते.

### iv) मीठ उद्योग :-

समुद्रकिनारी हा उद्योग विकसित होता. महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीला मीठ उत्पादन होत असे. तसेच बंगाल, लाहोर, अजमेर इ.सुभ्यातील अनेक ठिकाणी या उत्पादनाची केंद्रे होते. पोर्तुगीज व्यापारी त्यांच्या देशातून भारतात मीठ आणत असत. त्यांच्याशी भारतीय उत्पादकांना स्पर्धा करावी लागेल. अकबराच्या काळात आग्रा येथे १७ मणाला एक रुपया असा मिठाचा दर होता. तर सांबर येथे चार रुपये एक मण एवढी दरात विसंगती होती. मीठ उत्पादकांना शासनाची परवानगी घ्यावी लागेल. त्यासाठी कर भरावा लागत असे. असे असले तरी मिठ उद्योगाने अनेकांना त्यांच्या हाताला काम मिळवून दिले होते. व त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत केली होती.

### v) जहाज बांधणी उद्योग :-

मध्ययुगीन काळात समुद्रकिनाऱ्यावरील मंदिरामध्ये आणि तेथील जंगलामधून लाकूड पुरेसे उपलब्ध होईल. अशा ठिकाणी हा उद्योग केला जात असे. बारबासो म्हणतो, ‘मालदीव बेटावर जहाज बांधणीचा उद्योग होता. ताडासारख्या झाडाची बुंदी एकत्र शिवून मोठी जहाजी बनवली जात. तसेच सागाच्या लाकडाचाही यासाठी उपयोग करत कारण हे टिकाऊ व सहज उपलब्ध होणारी होती. कालिकत, कोचिंग, मालदीव बेटे तसेच महाराष्ट्रातील कल्याण, भिवंडी, अलिबाग, वसई, ठाणे इत्यादी केंद्रात हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालत होता. व लोकांना पुरेसा रोजगार मिळत होता. व त्याच्या आर्थिक विकासाला हातभार लागत होता.’

### vi) कागद व काच उद्योग-

तेराव्या शतकात भारतात कागद बनवण्याची कला अवगत झाली. त्यापूर्वी चीनमध्ये कागद बनवला जाईल. मुघल काळात भारतात अनेक ठिकाणी हा उद्योग सुरू झाला. उदा. बिहारमधील या उद्योगाची माहिती अबुल फजलने दिली आहे. सियालकोट येथे ही  केंद्र असून तेथील कागद अधिक दर्जेदार होता. कागद निर्मितीसाठी तुतींच्या झाडाची साल बांबू, चिंद्या इत्यादी घटकांचा वापर होत असे. दिवसेंदिवस कागद उद्योग आर्थिक दर्जेदार होत गेला काच उद्योगाची माहिती प्राचीन काळापासून भारताला होते. मुघल काळात आग्रा, बिहार, गुजरात, अहमदनगर इ. ठिकाणी या उद्योगाची केंद्रे होते त्यामुळे या व्यवसायाचाही आर्थिक उलाढालीमध्ये महत्त्वाचा सहभाग होता.

### vii) इतर उद्योग-

वरील महत्त्वाच्या उद्योगाशिवाय इतर अनेक लहान मोठे उद्योग भारतातील विविध भागात स्थानिक पातळीवर चालत असे. उदाहरणार्थ खाणीतून दगड काढणे, दगडावर कोरीव काम करणे, माती पासून भांडी, विटा बनविणे, कातडी पासून पादत्राने, पाण्याच्या पखाली बनवणे, लाकडी फर्निचर तयार करणे, खेळणी तयार करणे, मासेमारीचा उद्योग हस्तीदंती कलात्मक वस्तू खेळणी बनविणे, तेल बियांपासून खाद्यतेल बनविणे, याशिवाय नारळापासून तेल झाडापासून काथ्या , दोरी, नाडे, माद्यार्क, चटया, झाडू इत्यादी बनवण्याचे छोटे-मोठे उद्योग मुघल काळात होते. त्यामुळे सर्व भारतीय हाताला काम मिळत होते.

परिणामी या उद्योगांमुळे युगीन काळातील जनता स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम होती. या उद्योगामुळे भारताची आर्थिक उलाढाल ब्रिटिश येण्याअगोदर मोठ्या प्रमाणात चालत होते. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारत ब्रिटिशांची वासाहत बनला व भारताचे प्रचंड आर्थिक शोषण करण्यात आले परिणामी भारताचे आर्थिक सुबत्ता ब्रिटिश काळात लयास गेली असेच म्हणावे लागेल असे असले तरी ब्रिटिशांनी आपले प्रशासकीय कामकाज चालवण्यासाठी भारतात रेल्वे, रस्ते, दळणवळण अशा अनेक सुविधा केल्या. औद्योगिक क्रांतीनंतर भारतात अनेक मोठे उद्योगधंदे उभारले गेले या उद्योगधंद्याच्या आधारावरच स्वतंत्र भारत एक विकसनशील राष्ट्र म्हणून वाटचाल करत आहे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**आत्मनिर्भर भारत संकल्पना:-**

आत्मनिर्भर म्हणजे स्वतःवर अवलंबून असणे किंवा स्वावलंबी असणे. असा ढोबळ अर्थ आत्मनिर्भर या शब्दाचा होतो. कोरोना काळानंतर म्हणजे **12** मे **2020** रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही संकल्पना जगासमोर मांडली.

आत्मनिर्भर भारत या संकल्पनेत आत्मनिर्भर म्हणजे स्वतःवर निर्भर म्हणजेच आर्थिक दृष्ट्या स्वतःवर अवलंबून राहणे होय थोडक्यात इतर देशांच्या वस्तू व सेवा यांचा त्याग करणे व त्या वस्तू व सेवा आपल्या देशातच निर्माण करून त्यांचा उपयोग करणे .तसेच वैश्विक अर्थव्यवस्थेमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान प्राप्त करणे. असा व्यापक अर्थ आत्मनिर्भर भारत या संकल्पनेत आहे. याशिवाय "समावेशी विकास" साधने म्हणजेच देशाच्या प्रत्येक नागरिकाला आर्थिक लाभ पोहोचविणे. याच कामासाठी शासनाने **20** लाख कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. व आत्मनिर्भर भारत ही संकल्पना रुजविण्यास सुरुवात केली आहे. आपल्या गरजा आपणच पूर्ण करणे ही संकल्पना भारतासाठी नवीन आहे पूर्वी भारतात स्वयंपूर्ण खेडी होती बारा बलुतीदारी पद्धतीने आपल्या सर्व गरजा आपल्या गावातच पूर्ण होत होत्या म्हणजे त्याकाळी आपण बऱ्यापैकी आत्मनिर्भर होतो असेच म्हणावे लागेल परंतु कालांतराने म्हणजेच आधुनिक काळात आपल्या गरजा बदलल्या इतकेच नव्हे तर त्या वाढल्याही आणि ह्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपणास इतर देशांमधील वस्तू व सेवांवर अवलंबून राहावे लागले म्हणजेच आपण आत्मनिर्भरता गमावली म्हणूनच कदाचित नुकत्याच येऊन गेलेल्या कोरोना परिस्थितीनंतर इतर देशांशी आर्थिक व्यापारी संबंध ठेवणे उचित नसल्याने ही आत्मनिर्भर या संकल्पनेचा नारा माननीय पंतप्रधानांनी दिला असावा येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आत्मनिर्भर भारतीय योजना सरकारने खंबीरपणे राबवण्यास सुरुवात केली आहे

आत्मनिर्भर भारताची संकल्पना पाच स्तंभावर अवलंबून आहे **1)** अर्थव्यवस्था **2)** पायाभूत सुविधा **3)**व्यवस्था यंत्रणा **4)**सशक्त मनुष्यबळ असलेली लोकशाही**5)** मागणी या पाच स्तंभावर जर आपण काम केले तर भारत महासत्ता बनेल यात शंका नाही... स्वातंत्र्यपूर्व काळात ही स्वदेशी आणि विकेंद्रीकरण या दोनच संकल्पनांवर अधिक भर दिला होता याच दोन सूत्रांचा वापर आत्मनिर्भर या संकल्पनेत अपेक्षित आहे म्हणूनच मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया ,मुद्रांक योजना हे देखील या आत्मनिर्भर संकल्पनेचेच घटक आहेत.. त्यासाठी देशातील संसाधनाचा योग्य वापर करणे आणि वस्तू आपल्या देशातच बनविणे यामुळे इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही थोडक्यात प्रत्येक क्षेत्रात स्वतःवर निर्भर राहणे त्यामुळे देशात रोजगार निर्मिती होईल व प्रत्येकालाच सरकारी नोकरीची आवश्यकता राहणार नाही जो तो स्वतः रोजगार निर्माण करून आपला उदरनिर्वाह करेल म्हणजेच आत्मनिर्भर बनेल भारताने आत्मनिर्भर अभियानांतर्गत एक पाऊल टाकल्याची दिसत आहे उदा. पी.पी किटस , हायड्रोक्लोरोफिलच्या गोळ्या आपण मोठ्या संख्येने निर्माण केल्या व इतर देशांना पुरविल्या. थोडक्यात भारताने आत्मनिर्भरतेचे उदाहरणच जगापुढे ठेवले आहे.

सारांश:-

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

मध्ययुगीन कालखंडातील भारताच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना आपणास लक्षात येईल की सुरुवातीच्या काळात झालेल्या मुस्लिम आक्रमणामुळे सुद्धा भारताची आर्थिक स्थिती ढासळी नव्हती. सुलतानशाहीच्या व मुगलशाहीच्या स्थापनेनंतर वेगवेगळ्या राज्यकर्त्यांच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भरतेने कार्यरत होती जनतेवर लादलेल्या विविध करांच्या माध्यमातून सरकारला उत्पन्न मिळत होते हेच त्यांच्या उत्पन्नाचे साधन होते. कृषी पूरक व्यवसायामुळे व झालेल्या कृषी सुधारणांमुळे देखील मध्ययुगीन काळात भारत अन्नधान्याच्या बाबतीत बऱ्यापैकी स्वयंपूर्ण होता. अर्थात आत्मनिर्भर संकल्पना भारताला नवी नाही कारण मध्ययुगीन काळातील सर्व खेडी स्वयंपूर्ण होती. गरजा मर्यादित असल्यामुळे त्या खेड्यातल्या खेड्यातच बारा बलुतेदारी पद्धतीने  पूर्ण केल्या जात होत्या.

प्रमुख व्यवसाय शेतीबरोबरच इतर प्रमुख व्यवसाय कापड उद्योग ,धातू उद्योग, जहाज बांधणी उद्योग, मीठ उद्योग, साखर उद्योग मोठ्या प्रमाणात देशांतर्गत व परदेशाशी चालत असत. त्यावेळी उपलब्ध असणाऱ्या संसाधनाचा पुरेपूर व योग्य वापर केला जात होता. यातूनच भारताला आर्थिक सुबत्ता व संपन्नता लाभली होती. भारत आत्मनिर्भर होता असेच म्हणावे लागेल.

पुढे ब्रिटिशांच्या गुलामगिरीत राहिल्यामुळे भारताचे आर्थिक शोषण होऊन मध्ययुगीन अर्धव्यवस्थेची आत्मनिर्भरता संपुष्टात आली. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात भारताने अर्थव्यवस्था सक्षम करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे त्यातीलच एक भाग म्हणून बारा मे **2020** रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची मांडणी जगासमोर केली.

आत्मनिर्भर भारत म्हणजे स्वतःच्या गरजा स्वतः भागविणे आर्थिक दृष्ट्या सक्षम होणे इतर देशांच्या वस्तू व सेवांवर अवलंबून न राहता त्या वस्तू व सेवा स्वतःच्याच देशात निर्माण करणे होय त्यासाठी उपलब्ध संसाधनाचा उपयोग करून वस्तूंची निर्मिती करणे नोकऱ्यांच्या पाठी न लागता पर्यायाने रोजगार निर्मिती करणे म्हणजेच आत्मनिर्भरता होय. यासाठी स्थानिक उद्योगांना प्राधान्य देऊन प्रचंड प्रमाणात उद्योग निर्मिती व रोजगार निर्मिती करणे, स्वदेशीच वस्तूंचा वापर करणे निर्यातीत वाढ करणे व वैश्विक अर्थव्यवस्थेत भारताच्या अर्थव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान मिळवणे हेच आत्मनिर्भर भारत अभियानाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे ,आणि ते साध्य करण्याचा प्रत्येक भारतीय नागरिकांने प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे..तरच आत्मनिर्भर या संकल्पनेला वैश्विक रूप प्राप्त होऊन सर्व मानव  जातीचे कल्याण होईल. यात शंका नाही.!

संदर्भ :-

१) प्रा.डॉ. पी.एन. शिंदे, प्रा.ए.जी.थोरात – मध्ययुगीन भारताचा इतिहास ( १५२६-१७०७), फडके प्रकाश कोल्हापूर ( पहिली आवृत्ती – जुलै २०११) पान नं. ९६,९७,९८,१०६,१०८

२) डॉ. धनंजय आचार्य – भारताच इतिहास ( प्रारंभापासून इ.स. १७६० पर्यंत) श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर ( पहिली आवृत्ती-१५ जाने २००४) पान नं. ३१७,३१८,३१९,३२०

३) सतिश चंद्रा – History of Medical India, Orient Blackswan Private Limeted. Delhi ISBN : 9788125032267

४) प्राचार्य य.न. कदम – समग्र भारताचा इतिहास इ.स.पु ३५०००० ते इ.स.१८८४ फडके वूक हाऊस पुणे ( सहावी आवृत्ती २०१४)

५) S.K. sing – History of Medical India – Axis Books Pvt. Ltd (First Publish 2013) Page 70,82,88

६) Yuvarag M. Nalawade – Medieval India (100 Ad to 1707 A Sheth Publication- (First Edition 2009)